

सकाळ



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कनोईंग स्पर्धेत यश मिळवले.

## डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कनोईंग स्पर्धेत यश मिळवले. पंजाब युनिव्हर्सिटी पटियाला येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय कायाकिंग व कनोईंग स्पर्धा झाल्या. शिवाजी विद्यापीठ संघात महाविद्यालयाचे चार खेळाडू सहभागी झाले होते. करण घुणके, पवन कोळी, कौस्तुभ पोकार्डे, दर्शन पवार या खेळाडूंनी अनुक्रमे के २- १००० मी, के २ - ५०० मी, के २- २०० मी या प्रकारात सहभाग नोंदवला. घुणके व कोळी यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली. कोकाटे, पवार, घुणके, कोळी यांनी कांस्यपदक प्राप्त केले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार केला. खेळाडूंना जिमखानाप्रमुख मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे आदिंचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
12/04/2023 Page No. 4




दक्षिण महाराष्ट्र
केसरी
३ एप्रिल २०२३



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संघात निवड झालेले डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयाचे खेळाडू.

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी महाविद्यालयाचे खेळाडू करण राजू घुणके, पवण बाळू कोळी, कौस्तुभ करण पोकार्डे, दर्शन दत्तात्रय पवार तसेच महिला संघात पिया मारुती चव्हाण यांची पंजाब युनिव्हर्सिटी, पतियाला येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी कयाकिंग व कनोईंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कयाकिंग आणि कनोईंग सर्धेत के–१, के–२ व सी –१, सी– २ या प्रकारात या खेळाडूंनी यश संपादन केले. खेळाडूंचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार केला. प्रा. मेजर एम. जे. विरकर, प्रा. मुजंफ्फर लगीवाले व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संघात निवड झालेले डी.के. ए.एस.सी. महाविद्यालयाचे खेळाडू.

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी महाविद्यालयाचे खेळाडू करण राजू घुणके, पवण बाळू कोळी, कौस्तुभ करण पोकार्डे, दर्शन दत्तात्रय पवार तसेच महिला संघात पिया मारुती चव्हाण यांची पंजाब युनिव्हर्सिटी, पतियाला येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी कयाकिंग व कनोईंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कयाकिंग आणि कनोईंग सर्धेत के–१, के–२ व सी –१, सी– २ या प्रकारात या खेळाडूंनी यश संपादन केले. खेळाडूंचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार केला. प्रा. मेजर एम. जे. विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

केसरी
9921600800
3-4-2023

सकाळ

## शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १४ महाविद्यालये सहभागी

# इचलकरंजीत रोईंग, कयाकिंग स्पर्धा

इचलकरंजी, ता. २० : शहरात शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय रोईंग, कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धा झाल्या. येथील पंचगंगा नदीपात्रात झालेल्या स्पर्धेत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा आणि कोल्हापूर विभागांतून १४ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला.

रोईंग प्रकारात ५०० मीटर व २००० मीटरमध्ये सिंगल स्कल, डबल स्कल, पेअर, डबल पेअर, तर कनोईंग आणि कयाकिंगमध्ये २०० मीटर, ५०० मीटर व १००० मीटरमध्ये सी- १, सी- २, सी- ४, तर के- १, के- २, के- ४ हे प्रकार घेण्यात आले. दत्ताजीराव कदम आर्ट, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातर्फे पंचगंगा नदीपात्रात आंतरविभागीय रोईंग, कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धा झाल्या.

प्रमुख पाहुणे म्हणून अमृतमामा भोसले उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. विद्यापीठ निवड समितीचे चेअरमन प्रा. तानाजी साबळे, सदस्य प्रा. आमीन बाणदार, सौ. वर्षा शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. समितीने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघाची निवड केली. स्पर्धा संयोजनासाठी वरद विनायक बोट क्लबचे संस्थापक गणेश बरगाले व विजय माळी यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धेसाठी पंच म्हणून कृष्णा माने, कुमार मिठारी, करण घुणकी, कौस्तुभ पोकार्डे, साहील केसरकर, पवण कोळी, ओंकार दिवतणकर, अभिजित सासणे, संकेत पुजारी यांनी काम पाहिले. स्वागत व प्रास्ताविक जिमखाना विभागप्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी केले. सूत्रसंचालन आदिती चिकोर्डे यांनी केले. आभार एनसीसी विभागप्रमुख प्रा. मेजर मोहन विरकर यांनी मानले. यावेळी प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. रॉड्रिक्स, प्रतीक कदम उपस्थित होते.

### स्पर्धेतील विजेते खेळाडू

- १००० मीटर : के १ -सूरज बिजले (महावीर कॉलेज कोल्हापूर), सी १ -कुमार मिठारी (नाईट कॉलेज, इचलकरंजी), सी १- प्रिया चव्हाण (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी), सांघिक- के ४ - पवण कोळी, करण घुणकी, कौस्तुभ पोकार्डे व दर्शन पवार (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी), सी ४ -साहील केसरकर, ओंकार दिवटणकर, सोमनाथ लगड, पृथ्वीराज पाटील (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी), ५०० मीटर : के १ - श्रुती चौगुले, के २ - श्रुती चौगुले व आरती जाधव (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), सी १- संकेत इटाजपुजारी (एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड). २०० मी : के २ - निकिता पिष्टे (आजरा कॉलेज, आजरा), सी १ जयश खोत (शाहू कॉलेज, रुकडी), सी २ कृष्णा माने व अभिजित सासणे (भोगावती कॉलेज, भोगाव).

Kolhapur, Gadhinglaj-Today
21/02/2023 Page No. 4


SHIRI SWAMI VIVEKANAND SHIKSHAN SANSTHA, KOLHAPUR
DATTAJIRAO KADAM ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, ICHALKARANJI
Shivaji University, Kolhapur Inter-Zonal Competition
Rowing, Kayaking & Canoeing 2022-23
President
Hon. Pal. Amrutmama Bhosale
Chief Guest
Hon. Koustubh Gavade
GPS Map Camera
Kolhapur, Maharashtra, India
MF8F+7VX, Maharashtra 416143, India
Lat 16.666028°
Long 74.475032°
13/02/23 11:23 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Kolhapur, Maharashtra, India
MF8F+7VX, Maharashtra 416143, India
Lat 16.666038°
Long 74.474996°
13/02/23 11:26 AM GMT +05:30
Google



सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, १७ फेब्रुवारी २०२२

# कोल्हापूर जिल्ह्याचे वर्चस्व कायम

## रोईंग, कनोईंग, कयाकिंग स्पर्धा ; विद्यापीठाची आंतरविभागीय निवड चाचणी



इचलकरंजी : पंचगंगा नदीपात्रात शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय रोईंग, कनोईंग व कयाकिंग स्पर्धा झाल्या.

इचलकरंजी, ता.१६ : शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय रोईंग, कनोईंग व कयाकिंग निवड चाचणी स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्याने वर्चस्व कायम ठेवले. महिला विभागात डी. आर. माने व कोल्हापूरचे डी. वाय. पाटील कॉलेज सरस ठरले. पुरूष विभागात व्यंकटेश व डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी केली.

पंचगंगा नदी घाटावर नाईट कॉलेज व वरदविनायक बोट क्लबतर्फे स्पर्धेचे आयोजन केले. यातून विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाची निवड केली. हे खेळाडू चंदीगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणार आहेत. दादासो साबळे, बापू सलगर व वर्षा शिंदे यांच्या निवड समितीने काम पाहिले. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील खेळाडू सहभागी झाले होते.

निकाल अनुक्रमे असा : रोईंग-५०० मीटर पुरुष : श्रीकांत नरसंबे (पतंगराव कदम महाविद्यालय), गणेश माळी (जी. ए.आरवाडे कॉलेज), ओंकार पाटील (वालचंद कॉलेज). कयाकिंग-१००० मीटर (केवन) महिला-अमृता पाटील (डी. वाय. पाटील, कॉलेज), निकिता पिष्टे (डी. आर. माने, कॉलेज), श्रावणी हळींग्वाळे (विवेकानंद). ५०० मीटर (केवन) महिला- निकिता पिष्टे (डी. आर. माने), शालिनी पिसे (डी. वाय. पाटील),राजनंदिनी पाटील (के. आय. टी.). २०० मीटर (केवन) महिला- निकिता पिष्टे (डी. आर. माने), गायत्री पाटील (डी. वाय. पाटील), श्रावणी हळींग्वाळे (विवेकानंद). कयाकिंग पुरुष-१००० मीटर (केवन)-श्रेयांश पाटील (व्यंकटेश कॉलेज), करण घुणके (डीकेएएससी कॉलेज), ओंकार पाटील (के. डब्लू. सी.). ५०० मीटर (केवन) : श्रेयांश पाटील (व्यंकटेश कॉलेज), कौस्तुभ पोकार्डे (डिकेएएससी), सोहम मगदूम (नाईट कॉलेज, इचलकरंजी). २०० मीटर (केवन) : पवन कोळी (डिकेएएससी), श्रेयांश पाटील (व्यंकटेश कॉलेज), नीरज नलैकर (नाईट कॉलेज, इचलकरंजी).



सकाळ कोल्हापूर, शुक्रवार, १३ जानेवारी २०२३



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयामध्ये अग्निवीर निवड व खेळाडूंच्या सत्कारप्रसंगी सुरेश हाळवणकर, प्राचार्य डॉ. अनिल पाटील.

# एएससी महाविद्यालयात अग्निवीर, खेळाडूंचा सत्कार

## सुरेश हाळवणकर यांची उपस्थिती

**▸ सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १२ : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील अग्निवीर म्हणून निवड झालेल्या, तसेच यशस्वी खेळाडूंचा सत्कार केला. महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य माजी आमदार सुरेश हाळवणकर यांच्या हस्ते करण्यात आला.

महाविद्यालयातील चार एनसीसी कॅडेट सुशांत केणे, प्रवीण फुंडे, गुड्डी सिंग यांची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून निवड झाली आहे. योगा खेळाडू सानिका जाधव, मनम कासलीवाल, समीर सनगर यांनी राष्ट्रीय स्पर्धेत राज्य संघाचे नेतृत्व केले. प्रतिज्ञा अडसूळ, समीक्षा अडसूळ, सौरभ दौडवते, पुष्कर पाटील यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

मिनी ऑलिम्पिक स्पर्धेत कौस्तुभ पोकार्डे, करण घुणके, पवन कोळी, ओंकार देवतकर, प्रियांका चव्हाण, पायल वाघमोडे, अर्पिता गड्डे यांनी सुवर्णपदक मिळवले. त्यांचा सत्कार माजी आमदार हाळवणकर यांच्या हस्ते केला. प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डॉ. डी. ए. यादव, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. डॉ. अर्जुन जाधव आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner



सकाळ



इचलकरंजी : खेलो इंडिया स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावल्याबद्दल अनिकेत माने यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील.

# अनिकेत मानेचा सत्कार

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू अनिकेत माने याने खेलो इंडिया स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावले. हरियाणातील पंचकूला येथे झालेल्या चौथ्या खेलो इंडिया यूथ गेम्स राष्ट्रीय मैदानी क्रीडा स्पर्धेत त्याने उंच उडी स्पर्धेमध्ये नवीन विक्रम केला. २.७ मीटर उंच उडी मारून सुवर्णपदक प्राप्त केले आहे. गुजरातमधील नंदीयाड येथे २.६ मीटर उंचउडी मारून थोडक्यात त्याचे सुवर्णपदक हुकले होते. तोच विक्रम मोडीत काढून खेलो इंडिया यूथ स्पर्धेमध्ये त्याने २.७ मीटर इतकी उंच उडी मारून सुवर्णपदक मिळवून एक सेंटिमीटरने स्वतःचा विक्रम तयार केला आहे. त्याने महाराष्ट्राला ॲथलेटिक्स खेलो इंडिया स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवून दिले आणि महाविद्यालयाचा झेंडा अटकेपार लावला. अनिकेत हा बेंगलोर येथे भारतीय ऑलिम्पिकची खेळाडू सहाना कुमारी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. त्याचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते सत्कार केला. प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे व वडील सुभाष माने यांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Ichalkaranji-Today
18/06/2022 Page No. 102



अलिशा नाईकवाडे – खेलो इंडिया इंटर यूनिवर्सिटी स्पर्धेसाठी निवड

दक्षिण महाराष्ट्र केसरी ३ नोव्हेंबर २०२२/५



इचलकरंजी : अलिशा नाईकवाडे हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील आदी.

# डी.के.ए.एस.सी कॉलेजला बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या आंतर विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के. ए. एस. सी महाविद्यालयाची खेळाडू अलिशा नाईकवाडे (बी.ए.: ३. भाग. ३) हीने ६३ ते ६६ किलो वजनी गटात उत्कृष्ठ कामगीरी करत सुवर्णपदक पटकावले. व हरीयाणा रोहतक (हरीयाणा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉन्सिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. या स्पर्धेसाठी सांगली, सातारा व कोल्हापूर शहरातील विविध महाविद्यालयानी सहभाग नोंदवला होता.अलिशाचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिला प्रा. मेजर एम. जे. विरकर, प्रा. मुझकर लगीवाले व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner



करण घुणकी & पवन कोळी – चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय अंतरविद्यापीठ कयाकिंग स्पर्धेत सुवर्ण पदक




राकेश काकुमणी – उत्तर प्रदेश येथे झालेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत सुवर्ण पदक




मनाल कासलीवाल व सानिका जाधव याची खेलो इंडिया इंटर यूनिवर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य



२९ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, क्रीडा विभाग प्रमुख मुजफ्फर लगीवाले, मेजर मोहन वीरकर, प्रशांत कांबळे व रोहित शिंगे.



प्रतीक मगदुम – राज्यस्तरीय शरीर सौष्टव स्पर्धेत सुवर्ण पदक




शिवाजी विद्यापीठ अंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत अलिशा नाईकवाडे प्रथम



सकाळ
बुधवार,
२८ डिसेंबर २०२२



इचलकरंजी : अभय चषक क्रिकेट स्पर्धेतील विजेता दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचा संघ.

# अभय चषक क्रिकेट स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज विजयी

इचलकरंजी, ता. २७ : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे आयोजित अभय चषक या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या क्रिकेट संघ विजेता ठरला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धेचे आयोजन केले होते.

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या क्रिकेट संघाने उपांत्य सामन्यात विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर संघाला पराभूत करत अंतिम सामन्यात धडक मारली. अंतिम सामन्यात डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीरिंग, कोल्हापूर या संघांचा पराभव करून अभय चषक पटकावला. या संघासाठी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे व प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संघात प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रशांत कांबळे, विजय सूर्यवंशी, अर्जुन कोकरे, अक्षय स्वामी, अवधूत ढोकरे, संजय पाटील, जुबेर खतीब, चेतन पाटील, रघुनाथ शिरढोणे, जयकुमार करके, रविकिरण मेटी, ऋषीराज माने, प्रतीक कदम, प्रा. मेजर मोहन विरकर, अधीक्षक सुनील महाडिक व संदीप करडिले यांचा सहभाग होता.

CS Scanned with CamScanner

सकाळ

# न्यूनगंड बाजूला सारून जिद्दीने पुढे चला

## अनंत राऊत; डीकेएएससी महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**इचलकरंजी, ता. २८ :** संघर्ष माणसात आत्मविश्वास निर्माण करीत असतो. आत्मविश्वासाच्या बळावर आपल्यातील प्रतिभा ओळखा आणि झोकून द्या. यश तुमचेच असेल. राष्ट्रपुरुष महामानव आपले खरे आदर्श असून, त्यांच्या समता, बंधुता, मानवतावादी विचारांचा वारसा जतन करा. स्वतःतला न्यूनगंड बाजूला सारून जिद्दीने पुढे चालत राहा, असे प्रतिपादन अकोल्याचे प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी केले.

डीकेएएससी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विशेष निमंत्रित महानगरपालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख यांनी डीकेएएससी कॉलेज हे गुणवत्तापूर्ण कॉलेज आहे. या ज्ञानमंदिरात स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केंद्र बनावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे अध्यक्षस्थानी होते. आजची तरुण पिढी इंस्टाग्राम, फेसबुकच्या जाळ्यात अडकली आहे. महामानवांनी सर्वस्वाचा त्याग करून राष्ट्राला, समाजाला दिशा दिली आहे. त्याचप्रमाणे तरुणांनी जीवन घडवायला हवे, असे श्री. गावडे यांनी सांगितले.




**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलताना कवी अनंत राऊत. शेजारी कौस्तुभ गावडे, आयुक्त सुधाकर देशमुख आदी.**

### कवितांना भरभरून दाद

■ कवी अनंत राऊत यांनी एकापेक्षा एक कविता सादर करीत विद्यार्थ्यांची मने जिंकली. सादर केलेल्या 'मित्र गारव्यासारखा' व 'भोंगा वाजतोय' या गाजलेल्या कवितांना विद्यार्थ्यांची भरभरून दाद मिळाली. कविता आणि मनोरंजनातून प्रबोधनाचा ठसा उमटवला.

शैक्षणिक वर्षात क्रीडा, एनसीसी, सांस्कृतिक, कला, गुणवत्ता अशा क्षेत्रांत यश मिळवून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शिल्ड, ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गुणगौरव केला. महाविद्यालयातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या प्राध्यापक, प्राध्यापिका यांचाही सन्मान केला. वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक विकास अडसूळ यांची उपस्थिती होती. डॉ. डी. जी. घोडके यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. क्रीडा विभागाचा अहवाल वरिष्ठ जिमखाना प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी सादर केला. कनिष्ठ जिमखाना प्रमुख मेजर मोहन वीरकर यांनी पारितोषिकांचे वाचन केले.

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी आभार मानले. डॉ. प्रभा पाटील व प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. रोहित शिंगे यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
29/04/2023 Page No. 102